*महाराष्ट्र शासन वि. पवन*
*निशाणी क्र. ३७*

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०२ ची साक्ष</u>**

**मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**

माझे नाव – सुप्रिया सुशांत पवार

माझे वय – ४० वर्षे,

व्यवसाय – मपोहेकॉ/५१

रा./ने – मालवण पोलीस ठाणे, ता.मालवण, जि. सिंधुदुर्ग

**<u>सरतपास शपथेवर अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्रीमती यु.आर.हेरवाडे यांचे मार्फत.</u>**

०१. दि. ०४/०३/२०२१ रोजी माझी मालवण पोलीस स्टेशन येथे ठाणे अंमलदार म्हणून नेमणूक होती. सदर दिवशी शेखशोएब शेखसलीम पोलीस स्टेशनला मोबाईल चोरीची फिर्याद देण्यासाठी आला होता. मी त्यांची फिर्याद त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदविली होती. मला आता फिर्याद दाखविण्यात आली. त्यावर ठाणे अंमलदार म्हणून माझी व फिर्यादीची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **<u>नि.क्र.पी२/पीडब्ल्यू२</u>** दिली आहे.

सरतपास पूर्ण

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री.एस.एन.पई यांचे मार्फत.</u>**

०२. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीचे विलंबाबाबत कुठलेही स्पष्टीकरण नोंदविलेले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, छापील फिर्यादीमध्ये रकाना क्र. ८ मध्ये विलंबाबाबतचे कारण नमूद करावे लागते. मी छापील फिर्यादीमध्ये रकाना क्र. ८ मध्ये विलंबाबाबतचे कारण नमूद केले होते किंवा नाही हे मला आठवत नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी फिर्याद नोंदविताना त्यामध्ये नमूद असलेल्या मोबाईल क्रमांकाची पडताळणी करण्यासाठी कुठलाही कागदोपत्री पुरावा पाहिला नव्हता. मी फिर्यादीला ते नेमकी काय नोकरी करतात याबाबत विचारले नव्हते.

०३. हे म्हणणे खरे नाही की, दि. ०४/०३/२०२१ रोजी माझी मालवण पोलीस स्टेशन येथे ठाणे अंमलदार म्हणून नेमणूक होती, सदर दिवशी शेखशोएब शेखसलीम पोलीस

स्टेशनला मोबाईल चोरीची फिर्याद देण्यासाठी आला होता, मी त्यांची फिर्याद त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदविली होती, त्यातील मजकूर खरा व बरोबर असल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलट तपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

ठिकाण : मालवण
दिनांक : २०/०३/२०२५

महेश रा. देवकते
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, मालवण